# प्रकरण ६
# मूलभूत अधिकार आणि कर्तव्ये

❖ प्रस्तावना –

अनेक देशांमध्ये तेथील नागरिकांना त्यांच्या राज्यघटनेद्वारा अधिकार दिले जातात. अशा अधिकारांचा हेतू लोकांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी मदत करणे हा असतो.

अधिकार हे लोकशाही मजबूत करण्यासाठी सुध्दा आवश्यक असतात. म्हणूनच मूलभूत अधिकार हे भारताच्या संविधानाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

- ❖ अधिकार म्हणजे काय?

अधिकार म्हणजे एखाद्या व्यक्तीला विशिष्ट वर्तन करण्यास समाज आणि शासनाची मान्यता असणे होय. जेव्हा समाज आणि शासनसंस्था काही बंधने मान्य करतात तेव्हाच आपले हक्क अस्तित्वात येतात.

उदा –

जर तुम्ही शाळेत जाताना एखाद्या दिवशी शाळेचा गणवेश घातला नाही तर तुमच्या शाळेतील मुख्याध्यापक, पर्यवेक्षक किंवा तुमचे शिक्षक तुम्हाला शिक्षा करतात. यामध्ये शाळेची शिस्त (गणवेशात येणे) पाळली गेली नाही तर त्या विद्यार्थ्याला ती पाळण्यास बंधन घालण्याचा हक्क शाळेला असतो म्हणजेच शाळेला अधिकार असतो.

वरील उदाहरणावरुन आपल्याला अधिकार म्हणजे काय? हे समजले असेलच तसेच आपण मूलभूत अधिकार म्हणजे काय? हे अभ्यासणार आहोत.

- मूलभूत अधिकार –

“संविधानात समाविष्ट केलेल्या नागरिकांच्या हक्कांना मूलभूत अधिकार असे म्हणतात.”

मूलभूत हक्कांना संरक्षक असेच कायदे करण्याचा शासनास अधिकार असतो. त्यामुळे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांना कायद्याचे संरक्षण असणे नागरिकांसाठी महत्त्वाचे असते.

भारतीय संविधानाने नागरिकांना ६ प्रकारचे मूलभूत अधिकार दिले आहे.

❖ आपले (नागरिकांचे) मूलभूत अधिकार –

- व्यक्तीला मूलभूत अधिकार असतात आणि ते अबाधित राखण्याची जबाबदारी शासनावर असते, हा विचार लोकशाही तत्वज्ञानाचाच भाग आहे.
- ह्या दृष्टीने मूलभूत अधिकार म्हणजेच मानवी हक्क किंवा नैसर्गिक हक्क होत.
- भारताच्या संविधानात मूलभूत अधिकारांच्या जाहीरनाम्याचा समावेश असावा, हा विचार १८९५ मध्ये ॲनी बेझंट ह्यांनी त्या वर्षाच्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात सर्वप्रथम मांडला.

- १९२८ मध्ये काँग्रेस पक्षाने भारताच्या संविधानाची रूपरेषा सुचविण्याकरिता पं. मोतीलाल नेहरू ह्यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमली, तिनेही संविधानात मूलभूत अधिकारांची हमी देणाऱ्या तरतुदी समाविष्ट कराव्यात असे सुचवले.
- १९३१ च्या कराची काँग्रेसमध्ये मूलभूत अधिकारांचा ठराव पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनी मांडला.
- स्वतंत्र भारताच्या संविधानात मूलभूत अधिकार असावेत, हा निर्णय घटनासमितीने एकमताने घेतला.
- अनुशेष १२ ते ३५ ह्यांत मूलभूत अधिकारांच्या तरतुदी समाविष्ट आहेत.
- ह्याला संविधानाचा तिसरा भाग म्हटले जाते.

- हे मूलभूत अधिकार शासनावर बंधनकारक आहेत.
- शासनाने ह्या अधिकारांचा संकोच करणारा किंवा ते नष्ट करणारा कुठलाही कायदा करता कामा नये. असा कायदा केल्यास तो रद्दबातल ठरेल.
- तसेच ह्या अधिकारांना नष्ट करणारा किंवा त्यांचा संकोच करणारा कायदा जर घटना कार्यान्वित होतेवेळी अस्तित्वात असेल, तर तो ती घटना कार्यान्वित होण्याच्या तारखेपासून व मूलभूत अधिकारांशी असलेल्या विसंगतीपुरता रद्दबातल होईल.

- कायदा ह्याचा अर्थ संसदेने किंवा राज्य विकास मंडळाने केलेला वटहुकूम किंवा त्याखाली देण्यात आलेला हुकूम, नियम, उपनियम, अधिसूचना किंवा कायद्याची क्षमता असलेली रूढी किंवा प्रथा असा आहे.
- शासन ह्या शब्दाच्या व्याख्येत संसद आणि केंद्र सरकार, राज्य विधानमंडळे व राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय अधिकारप्राप्त संस्थांचा समावेश आहे.
- ह्यात शासनाने कायदा करून स्थापन केलेल्या महामंडळांचा समावेश तर आहेच; पण जी संस्था शासनातर्फेच कार्य करते, तिचाही समावेश आहे.

- भारताच्या संविधानात अनुच्छेद १२ ते ३५ मध्ये एका स्वतंत्र विभागात मूलभूत अधिकार नमूद केलेले आहेत.
- या मूलभूत अधिकारांमध्ये स्वातंत्र्य, समता, पिळवणुक विरुध्दचा अधिकार, धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार, सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकार आणि घटनात्मक उपायांचा अधिकार यांचा समावेश केला आहे.

# मूलभूत अधिकार

- समानतेचा अधिकार
- शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार
- स्वातंत्र्याचा अधिकार
- पिळवणुकीविरुध्दचा अधिकार
- घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार
- धर्मस्वातंत्र्याचा अधिकार

१.  समानतेचा अधिकार –

- समानतेचा अधिकार म्हणजे सर्वांना सारख्या संधी उपलब्ध करुन देणे.
- या अधिकारानुसार शासनाला नागरिकांमध्ये धर्म, जात, वंश, लिंग इत्यादी कारणांवरुन भेद करता येत नाही.
- सर्व लोकांना समान वागणूक देणे एवढीच शासनाची जबाबदारी नाही तर आपल्या सामाजिक संबंधांमध्ये समानता आणली जाईल अशी धोरणे अंमलात आणणे ही सुध्दा सरकारची जबाबदारी आहे.



- आपल्या देशात जन्माला येणाऱ्या प्रत्येक बालकाला शाळेत जाण्याचा व शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.

  उदा –

  सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत ६ ते १४ या वयोगटातील मुला-मुलींना मोफत शिक्षणाचा अधिकार दिला आहे.

- संविधानाने अस्पृश्यतेच्या प्रथेचे निर्मुलन केले असून, अस्पृश्यतेचे पालन करणे हा गुन्हा ठरवला आहे.
- सर्व भारतीय नागरिक कायद्यापुढे समान असतात आणि सर्वांना कायद्याचे समान संरक्षण असते.

२. स्वातंत्र्याचा अधिकार –

- जगण्याचा अधिकार हा व्यक्तीचा एक सर्वात महत्त्वाचा अधिकार आहे.
- संविधानाने भारतीय नागरिकांना सहा प्रकारच्या स्वातंत्र्याची हमी दिलेली आहे. ती पुढीलप्रमाणे –

१. भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य –

- हे स्वातंत्र्य सर्वात महत्त्वाचे स्वातंत्र्य आहे.
- नागरिकांना विचार करण्याचे आणि आपले विचार विविध माध्यमांतून व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य आहे.

२. सभा स्वातंत्र्य –

- शांततेने व विनाशस्त्र सभा आयोजित करण्याचा अधिकार आहे.
- नागरिक शांततेने मोर्चा, निषेध सभा इत्यादींचे आयोजन करु शकतात.

३. संघटना स्वातंत्र्य –

- समान विचारांचे लोक एकत्र येवून संघटना स्थापन करु शकतात.

४. संचार स्वातंत्र्य –

- भारतीय नागरिकांना देशातील वेगवेगळया भागात मुक्तपणे फिरण्याचे स्वातंत्र्य आहे.

५. वास्तव्य स्वातंत्र्य –

- भारतात कोठेही (काश्मिर सोडून) राहण्याचे व कायमस्वरुपी वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य आहे.

६. व्यवसाय स्वातंत्र्य –

- कोणताही व्यवसाय, व्यापार, उद्योग, धंदा करण्याचे स्वातंत्र्य आहे.

या सहा स्वातंत्र्यांशिवाय आणखी दोन महत्त्वाची नागरी स्वातंत्र्ये संविधानाने दिली आहेत.

- त्यानुसार कोणत्याही व्यक्तीला बेकायदेशीरपणे अटक करता येत नाही.
- तसेच शासन कोणत्याही व्यक्तीचे जीवित व स्वातंत्र्य बेकायदेशीररीत्या हिरावून घेऊ शकत नाही.
- २००९ साली शिक्षणाच्या अधिकाराचा समावेश करण्यात आला.
- वय वर्षे ६ ते १४ मधील सर्व मुलामुलींना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार आहे.

३. पिळवणुकीविरुध्दचा अधिकार –

- इच्छा नसताना काम करण्याची सक्ती जर कोणावर काही व्यक्तींकडून केली जात असेल तर स्वातंत्र्य व समता दोन्हींचा भंग होतो.
- गरिबीमुळे काही शेतकरी खाजगी सावकारांकडून कर्ज घेत असत आणि हे सावकार त्यांच्या कर्जाची परतफेड होईपर्यंत त्यांना सक्तीने काम करायला लावत असत. ह्यालाच वेठबिगार म्हटले जात असे.
- संविधानाने ह्या पध्दतीवर कायदयाने बंदी घातली आहे.
- त्यानुसार कोणत्याही स्वरुपात गुलामगिरी राहणार नाही आणि कोणालाही गुलाम म्हणून वागणूक दिली जाणार नाही.

- दारिद्र्याचा दुसरा परिणाम म्हणजे गरिब कुटुंबातील मुलांना पैसा मिळविण्यासाठी काम करावे लागते.
- मुलांना काही वेळा कठीण व धोक्याची कामे करावी लागतात.

    उदा –

        खाणकाम, फटाके बनविणे.
- संविधानाने अशा प्रकारचे काम करण्यावर बंदी घातली आहे.
- १४ वर्षांखालील मुलांना धोकादायक कामांवर नोकरी देता येत नाही.

❖ धर्मस्वातंत्र्याचा अधिकार –

- भारतात निरनिराळ्या धर्मांचे लोक राहतात.
- शासनसंस्था कोणत्याही धर्माला पाठिंबा देत नाही किंवा विरोधही करत नाही.
- प्रत्येक व्यक्तीला कोणताही धर्म पाळण्याचे व धर्माचा प्रसार करण्याचे स्वातंत्र्य आहे.
- धर्माच्या आधारावर सरकार व्यक्तींमध्ये भेदभाव करु शकत नाही.
- सरकारी मदत मिळणाऱ्या शाळांमध्ये कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जात नाही.

❖ शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार –

- भारतात मोठ्या प्रमाणात विविधता आहे.
- आपल्या देशातील लोक अनेक भाषा बोलतात, वेगवेगळया धर्मांचे पालन करतात.
- विविध सांस्कृतिक चालीरीती पाळतात आणि निरनिराळे सण साजरे करतात.
- संविधानाने अल्पसंख्यांकांना शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकार देऊन सांस्कृतिक विविधतेची हमी दिली आहे.
- त्यांना स्वतंत्र शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य देखील आहे.

❖ घटनात्मक उपाय योजनेचा अधिकार –

- आपल्या संविधानात आपल्याला असलेल्या अधिकारांची यादी दिलेली आहे.
- आपले हे अधिकार कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.
- अशा प्रकारची हमी (जबाबदारी) संविधानाने आपल्याला दिली आहे. जर आपले अधिकार कोणी हिरावून घेतले तर त्यांच्या (अधिकारांच्या) संरक्षणासाठी आपण सरकारकडे जाऊ शकतो.
- तसेच एखाद्या अधिकाऱ्याने किंवा खुद्द (स्वत:) सरकारनेच हक्क डावलले तर आपण त्या विरोधात न्यायालयात जाऊ शकतो.
- यालाच घटनात्मक उपाययोजनेचा अधिकार असे म्हणतात.

## आपले इतर अधिकार

- माहितीचा अधिकार
- सकारात्मक व नकारात्मक अधिकार
- मानव अधिकार

- आपले इतर अधिकार –

- अधिकारांची कल्पना मूलभूत अधिकारांपुरती मर्यादित नाही.

  उदा –

  भारतातील मतदारांना मतदानाचा अधिकार आहे. हा अधिकार मूलभूत अधिकारांमध्ये समाविष्ट नाही. पण तो आपला घटनात्मक अधिकार आहे.

- संविधान लिहून झाल्यानंतरच्या काळात आपल्या अधिकारांमध्ये वाढ झालेली दिसते.

  उदा –

  आज आपल्या देशात शिक्षणाचा अधिकार आहे. या अधिकारानुसार ६ ते १४ वर्षे वयाच्या बालकांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार मिळाला आहे.
- माहितीचा अधिकार अंमलात आला आहे; पण तो मूलभूत अधिकारांचा भाग नाही.

❖ माहितीचा अधिकार –

- माहितीचा अधिकार म्हणजे नागरिकांजवळ पुरेशी माहिती नसेल तर ते शासनाचे मूल्यमापन करु शकणार नाही.
- लोकशाहीत नागरिकांना शासनाकडून माहिती मिळवण्याच्या अधिकाराचाही समावेश होतो.
- जगभर या विचाराला मान्यता मिळाली आहे.
- या विचारालाच माहितीचा अधिकार असे म्हणतात.
- अनेक सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रयत्नानंतर भारत सरकारने माहितीचा अधिकार संमत केला.
- या कायद्यामुळे भ्रष्ट व्यवहार नियंत्रणात येतील आणि सरकारच्या कारभारात पारदर्शकता आणता येईल असे मानले जाते.

- ❖ सकारात्मक व नकारात्मक अधिकार –
- अधिकार हे आपल्या व्यक्तिगत विकासासाठी आवश्यक असतात तसेच ते सामाजिक विकासासाठी देखील आवश्यक असतात.
- समाजातील दुर्बल व मागासलेल्या घटकांना अधिकारांमुळेच आपल्या परिस्थितीत सुधारणा करता येतात.
- समानतेचा अधिकार हा फार महत्वाचा अधिकार आहे.
- अधिकारांमुळेच शासनाच्या सत्तेवर मर्यादा निर्माण होतात.

- अधिकार हे दोन प्रकारचे असतात.
- काही अधिकार हे शासनावरील निर्बंधाच्या स्वरुपात असतात.
- सरकार काय करु शकत नाही व सरकारने काय करु नये हे ते अधिकार सांगतात.
- आपण त्यांना नकारात्मक अधिकार म्हणतो; कारण सरकारने काय करायचे नाही हे त्यात सांगितलेले असते.
- दुसरीकडे काही अधिकार, सरकारने काय करायला पाहिजे ते सांगतात, हे सकारात्मक अधिकार होत.
- शिक्षणाचा अधिकार हा सकारात्मक अधिकार आहे.
- भाषण स्वातंत्र्य हा नकारात्मक अधिकार आहे; कारण आपल्या भाषण स्वातंत्र्यावर सरकार असमर्थनीय बंधने घालू शकणार नाही असे हा अधिकार सांगतो.

❖ मानव अधिकार –

- प्रत्येक मनुष्याला  काही अधिकार असतात हे आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्य झाले आहे. या अधिकारांना मानव अधिकार असे म्हणतात.
- १० डिसेंबर १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्रांनी मानव अधिकारांचा वैश्विक जाहिरनामा स्वीकारला.
- हा दिवस " आंतरराष्ट्रीय मानव अधिकार दिन " म्हणून पाळला जतो.
- १९६६ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकारांची आंतरराष्ट्रीय सनद स्वीकारली.
- अनेक राष्ट्रांनी त्यावर संमतिदर्शक स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

- आंतरराष्ट्रीय मानदंडाप्रमाणे भारताने १९९३ मध्ये राष्ट्रीय मानव अधिकार आयोग स्थापन केला आहे.
- मानव अधिकारांच्या वैश्विक जाहिरनाम्यात अनेक महत्त्वाच्या अधिकारांचा समावेश आहे.
- भाषण स्वातंत्र्य, संचार स्वातंत्र्य इ. व्यक्तिगत स्वातंत्र्ये, समानतेचा अधिकार, सांस्कृतिक अधिकार धर्म स्वातंत्र्य यांचा त्यात समावेश आहे.
- या व्यतिरिक्त कामाचा अधिकार, विश्रांतीचा आणि फुरसतीचा अधिकार, शिक्षणाचा अधिकार यांसारख्या व्यापक अधिकारांचाही समावेश आहे.
- “ आपल्या सर्वांसाठी प्रतिष्ठा आणि न्याय ” हे या जाहिरनाम्याचे घोष वाक्य आहे.

❖ नागरिकांची कर्तव्ये –

- प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे.
- संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.
- स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.
- देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.
- आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.
- सर्व प्रकारचे भेद विसरुन एकोपा वाढवावा.

- स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणेल अशा प्रथांचा त्याग करावा.
- आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.
- भारताच्या सर्व नागरिकांविषयी बंधुभाव बाळगणे.
- पर्यावरणाचे रक्षण करणे.
- वैज्ञानिक दृष्टी स्वीकारणे.
- सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे.
- हिंसेचा त्याग करावा.
- ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन द्याव्यात. (या कर्तव्याचा समावेश २००२ साली करण्यात आला.)

# Assessment

- 

१. मूलभूत अधिकारांची व्याख्या लिहा.
२. संविधानाने नागरिकांना एकूण किती प्रकारचे मूलभूत अधिकार दिलेले आहेत?
३. भारताच्या संविधानात मूलभूत अधिकारांचा समावेश असावा अशी भूमिका सर्वप्रथम कोणी मांडली?
४. कराची कॉंग्रेसमध्ये मूलभूत अधिकारांचा ठराव कोणी मांडला?

# उत्तरे

१. संविधानात समाविष्ट केलेल्या नागरिकांच्या हक्कांना मूलभूत अधिकार असे म्हणतात
२. भारतीय संविधानाने नागरिकांना ६ प्रकारचे मूलभूत अधिकार दिले आहे.
३. ॲनी बेझंट ह्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात ही भूमिका सर्वप्रथम मांडली.
४. १९३१ च्या कराची काँग्रेसमध्ये मूलभूत अधिकारांचा ठराव पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनी मांडला.

# Exercises

- वर्ग शिक्षकांच्या मदतीने नगरपालिका किंवा महानगरपालिका यांच्या सर्व साधारण सभेस उपस्थित राहून एखाद्या कायद्यासंदर्भातील चर्चा ऐका. सभागृहातील सदस्यांशी चर्चा करुन कायदे निर्मिती ते कायद्यांची अंमलबजावणी हे टप्पे समजून घ्या.